नि.फौ.ख.क्र. १४४/२०२५
सरकार वि. राजेश
नि.क्र. ७

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते कि
नाव - पंकज केशव वहीले,
वय - ३० वर्ष, व्यवसाय – बांधकाम,
राहणार – अडेगाव, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.व्ही. रामटेके मार्फत**

१. मी आरोपीला ओळखत नाही. दि.२९.१२.२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करीता समंस दिले होते. आता मला सदरचे समंस दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही अनुक्रमांक १ वर आहे. सदर समंस ला **नि.क्र.८** देण्यात येत आहे.

२. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. सदर पंचनाम्यांवर मी वाचून सही केली होती. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही अनुक्रमांक १ आहे. सदर घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याला **नि.क्र. ९** देण्यात येत आहे. त्यावेळेस माझ्यासोबत एक दुसरा पंच हजर होता. पोलीसांनी माझ्या समक्ष सोनालीका ट्रॅक्टर ज्यामधे एक ब्रास रेती व एक स्प्लेंडर मो.सा. जप्त केली होती.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री.ए.एस. रेवतकर यांच्या मार्फत –**

३. पोलीसांनी मला पंचनामा करणेकामी समंस दिले तेव्हा मी माझ्या घरासमोर उभा होतो. घटनास्थळ ते माझे घर ६ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस मला त्यांच्या सोबत घटनास्थळी घेऊन गेले. साक्षदार स्वतहून सांगतो की, पोलीस अगोदर गेले त्यानंतर मी गेलो. मी कामा निमित्त पो.स्टे. ला जात नसतो. पोलीसांनी मला दुपारी ०४.०० वा दरम्यान समंस दिले. हे म्हणणे खरे आहे की, दुसरा पंच माझ्या गावाचा आहे. मी ०४.०० वा घटनास्थळावर आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी येऊन माझी सही घेतली. पोलीसांनी माझी एकाच कागदावर सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी लिखापडी करून फक्त माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी अगोदरच लिखापडी करून ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा च्या वेळेस दुसरा पंच हजर नव्हता. हे

नि.फौ.ख.क्र. १४४/२०२५
सरकार वि. राजेश
नि.क्र. ७

म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात आरोपीला फसविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.
मौदा.
दिनांक. ११.१२.२०२५

समक्ष
**स्वाक्षरी/-**
(एन.के. वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मौदा